जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.tfzone125@mahapolice.gov.in

THANE POLICE COMMISSIONERATE

# प्रेसनोट

दिनांक :- १६/०७/२०२५

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर ची कामगिरी

**६६१.८ ग्रॅम वजनाचा एम. डी. ( मॅफेड्रॉन) हा अंमली पदार्थ तसेच कोडीयनयुक्त कफ सिरपच्या ४६७ बाटल्यांची विक्री करणारे इसमांच्याविरुदध कारवाई करून नायजेरियन आरोपीसह ३ आरोपी अटक करून एकुण ६७,१२,३७७ /- रू. किमतीचा मुद्देमाल हस्तगत**

-------------------ooo-------------------

मा.पोलीस आयुक्त,ठाणे श्री.आशुतोष डुंबरे यांनी अंमली पदार्थ विक्री करणा-या इसमांचे विरूध्द कडक कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. त्याअनुषंगाने अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा ठाणे शहर यांनी खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

**१)** दिनांक १२.०७.२०२५ रोजी प्राप्त बातमीच्या आधारे सापळा कारवाई करून, दिनांक १२/०७/२०२५ रोजी २१.३५ वा.चे सुमारास रिवरवुड पार्क समोर, देसाई नाका, खिडकाळी रोड, शिळडायघर, ठाणे याठिकाणी इसम नामे **John James Francis @ Onah Chiedozie Ethelbert @ John Ezugwa Francis जॉन जेम्स फ्रान्सिस उर्फ ओनाह चिडोझी एथलबर्ट उर्फ जॉन इझुग्वा फ्रान्सिस, वय ४५ वर्षे रा. मस्जिद बंदर रोड, मुंबई मुळ रा. नायजेरीया देश** याचे ताब्यात **एकुण रू. ६६,१८,०००/- किंमतीचा एकुण ६६१.८ ग्रॅम वजनाचा 'एमडी Mephedron'** हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना जप्त करण्यात आलेला आहे. सदरबाबत **शिळडायघर पोलीस स्टेशन** येथे **गु.रजि.क्र.६१/२०२५ एनडीपीएस कायदा कलम ८(क),२२, (क)** प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. अटक आरोपीताची दिनांक १७/०७/२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे.

**अटक आरोपीचा पुर्व इतिहास:-**

१) अंमली पदार्थ विरोधी पथक बांद्रा मुंबई गु.रजि.नं. १/२०१९ एनडीपीएस ॲक्ट ८(क),२१ (क),२९ सह भा.द.वि.४६५, ४६८,४७१ सह परकीय नागरीक कायदा क.३(१)१२, (१-ए) (बी) प्रमाणे. **( नमुद आरोपी हा सदर गुन्हयात ६ वर्ष शिक्षा भोगुन दिनांक १३/११/२०२४ रोजी कारागृहातुन बाहेर आलेला आहे. )**

**२)** दिनांक ०९/०७/२०२५ रोजी २०.३५ वा.चे सुमारास गोवेनाका, कोनगांव, भिवंडी, जि. ठाणे येथे इसम नामे १) नौशाद अन्सार अहमद शेख, वय ४५ वर्षे, रा. आबुजी अपार्टमेंट, भिवंडी, २) मोहमद तौकीर फारुख अन्सारी, वय २४ वर्षे, रा. नागांव, ता. भिवंडी यांनी आपसात संगणमत करून आपल्या ताब्यात Altorex-cd, RX Codeine Phosphate & Triprolidine Hydrochloride Syrup 100 ml कोडीनयुक्त कफसिरपच्या २७९ तसेच RX CODIMOSTAR Codeine Phosphate and Chlorpheniramine Maleate Syrup Cough Syrup 100 ml कोडीनयुक्त कफ सिरपच्या १८८ बॉटल्स अश्या **एकूण ४६७ बॉटल्स ८७,७७७/- रू. किमतीचा मुद्देमाल च्या बॉटल्स** विक्री करीता बेकायदेशिरपणे कब्जात बाळगले असताना मिळुन आले.

Scanned with CamScanner

करिता त्यांच्याविरुद्ध कोनगांव पो.स्टे.गु.रजि.नं. १२/२०२५ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८(क), २२ (क) २९ सह औषधे व सौंदर्य प्रसाधने अधिनीयमाचे अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

**अटक आरोपीत नौशाद शेख याचा पुर्व इतिहासः-**

१) शांतीनगर पो. स्टे. गुन्हा रजि नं. ७४२/२०२२ एनडीपीएस कायदा क.८ (क) २० (ब) अन्वये.

अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून मुंब्रा, भिवंडी,कल्याण व ठाणे परिसरात आरोपी यांचा अंमली पदार्थाची तस्करी करण्याचा कट उघडकीस आणलेला आहे. अटक आरोपीतांनी एवढया मोठया प्रमाणात एम. डी. व कप सिरफचा साठा कोठून आणला आहे.? त्यांचे आणखी साथीदार कोण आहेत? या बाबत सखोल तपास करीत आहोत.

सदरची कामगिरी श्री.आशुतोष डुंबरे, मा.पोलीस आयुक्त, ठाणे, मा.पोलीस सह आयुक्त, डॉ.श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे,ठाणे डॉ.श्री.पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे,ठाणे श्री.अमरसिंह जाधव, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रतिबंध)श्री.धनाजी क्षिरसागर यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक - राहुल मस्के, सपोनि/निलेश मोरे, सपोनि/जगदीश गावीत, पोउपनिरी/दिपेश किणी, पोउपनिरी/नितीन भोसले, पोउपनिरी/राजेंद्र निकम, ग्रेड पोउपनिरी/ मोहन परब, पोहवा/३७३१ विक्रांत पालांडे, पोहवा/२०७६ प्रशांत राणे, पोहवा/१४९५ शिवाजी वासरवाड, पोहवा/३७४५ अभिजीत मोरे, पाहवा/५७२९ हरीश तावडे, पोहवा/१८५९ हेमंत महाले, पोहवा/२७८८ महेश साबळे, पोहवा/४२४८ अमोल देसाई, पोहवा/६३३१ हुसेन तडवी, पोहवा/६४३६ संदीप भांगरे, पोना/४८४७ अनुप राक्षे, मपोहवा/६८५२ शिल्पा कसबे, मपोकॉ/३४ कोमल लादे यांचे पथकाने केलेली आहे.

Scanned with CamScanner